# छोटीशी कल्पना मोठा व्यवसाय निर्माण करते- श्री. मुकेश जैन

कोल्हापूर जिल्हाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अनेक स्टार्टप्स आहेत अशी अनेक उद्योगाची उदाहरणे देता येतील ज्यांची सुरुवात ही एका छोट्याशा कल्पनेने झाली आहे सुरुवातीस छोटी वाटणारी कल्पना आज एका मोठ्या उद्योगांमध्ये रूपांतर झालेले आहेत म्हणून स्टार्ट अप साठी एक कल्पना सुचणे महत्त्वाचे असते असे विधान श्री. मुकेश जैन यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे ते बोलत होते. अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'बिल्डिंग स्टार्टप्स अँड इनक्युबेशन' या विषयावर सदर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दोन सत्रांमध्ये कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये श्री. मुकेश जैन यांनी 'आयडिया ऑफ स्टार्टअप अँड नीड ऑफ स्टार्टअप इन कंटेम्पररी टाईम' या विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात ते पुढे म्हणाले सध्या अनेक नवीन योजना भारत सरकार स्टार्टअप च्या माध्यमातून देत आहे जेणेकरून देशातील तरुण युवकांना आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करता येईल व इतर बेरोजगार तरुणांना देखील रोजगार निर्माण करून देता येईल युवकांनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून नवीन कल्पना शोधाव्यात व्यवसाय करण्याची इच्छा बाळगावी त्यांना भारत सरकारच्या स्टार्टअप योजनेअंतर्गत सरकार निधी उपलब्ध करून देते अनेक नवीन उद्योगांची उदाहरणे देत त्यांनी स्टार्टअप योजनेविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये श्री. अरिफ अत्तार यांनी 'बिल्डिंग इकोसिस्टीम फॉर स्टार्टअप अँड इनक्युबॅशन' या विषयावर व्याख्यान दिले. नवीन व्यवसायाच्या उभारणीसाठी, वाढीसाठी व वृद्धीसाठी पोषक वातावरण तयार करणे म्हणजे इंक्युबॅशन होय. व्यवसाय नव्याने उभा करण्यासाठी जिद्द, मेहनत व चिकाटी हे गुण असावे लागतातच. भारत ही सद्यस्थितीतील एक मोठी बाजारपेठ आहे इतर सर्व देश भारतामध्ये वस्तू विक्री करण्यासाठी उत्सुक आहेत त्यामुळे येथील युवकांना नवीन उद्योग व रोजगार निर्माण करण्यास खूप वाव आहे फक्त त्यासाठी धाडस करणे, कम्फर्ट झोनच्या बाहेर येऊन काम करावे लागणे गरजेचे आहे. स्टार्टअप व इंक्युबॅशन सेंटर तुम्हाला व्यवसाय स्थापन करण्यासाठी व वृद्धीसाठी नेहमी निधी पुरवण्यासाठी तयार आहे. उबेर, ओला, झोमॅटो, ओ. वाय. ओ. अशा अनेक उद्योगांची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप व इन्क्युबॅशन सेंटर विषयी माहिती दिली. आयफोन मोबाइल कंपनी इतकी जास्त किंमत का आकारते याचे स्पष्टीकरण देताना त्यांनी आयफोन ने आपले इकोसिस्टीम तयार केले आहे. गुगलवर सर्च केल्यास आपणास लक्षात येईल की आयफोनच्या मोबाईल फोन मध्ये अनेक पेटंट असलेले स्पेअर पार्ट्स आपण पाहतो आयफोन जास्त किंमत आकारते कारण आयफोन दर्जा देत आहे म्हणून इकोसिस्टीम खूप महत्त्वाची आहे असे मत त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात व्यक्त केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. अनेक छोट्या-छोट्या नवीन स्ट्रॅटेजी, कल्पना तुम्हाला अनेक नवीन उद्योगाच्या संधी देऊन जातात त्या संधी वेळीच ओळखून विद्यार्थ्यांनी उद्योगाची सुरुवात करायला हवी त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सरकारी योजना जसे की स्टार्टअप, मेक इन इंडिया, स्किल इंडिया अशा योजनांबाबत विद्यार्थ्यांनी जागरूक असायला पाहिजे त्याचा फायदा घ्यायला हवा. आजच्या व्याख्यानाचा निश्चितच विद्यार्थ्यांना नवीन एखादा उद्योग सुरू करण्यासाठी नवीन कल्पना देईल व त्याचा त्यांना फायदा होईल याची खात्री त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केली. कार्यशाळेचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अग्रणी महाविद्यालय समन्वयीका डॉ. एस. एन. जरंडीकर

यांनी केले. तर सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका कु. मोहिनी अंचलिया व कार्यशाळेचे आभार सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. बी. मलघाण यांनी मांडले. कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग, सर्व प्राध्यापक व प्राध्यापके तर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

